सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जनसंपर्क अधिकारी, गुन्हे अन्वेषण विभाग**
महाराष्ट्र राज्य, पुणे
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे - ४११००८.

दि. १०/१०/२०२६

**जाक्र. गुअवि/MSPDM-Press Note/२०२६,**

# प्रेसनोट

२१ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२६ चा समारोप समारंभ दि. १०/१०/२०२६ रोजी १७.०० वाजता राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. २, पुणे येथील परेड ग्राऊंड येथे प्रमुख पाहुणे श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे उपस्थितीत संपन्न झाला. समारोप समारंभात बँड पथकाद्वारे प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देण्यात आली. श्री सुनील रामानंद, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., पुणे यांनी प्रमुख पाहुणे यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. स्पर्धेत सहभागी २६ संघांनी शिस्तबद्ध संचलन करुन प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली तसेच त्यांना मेळावा व स्पर्धेविषयी माहिती दिली.

प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सर्व स्पर्धांमधील उत्कृष्ट संघांना खालीलप्रमाणे फिरते चषक प्रदान करण्यात आले आहेत.

## Best Team Performance Trophy

| | |
|---|---|
| **१) सायंटीफीक एड टू इन्व्हेस्टीगेशन चषक** | **- दहशतवाद विरोधी पथक** |
| **२) पोलीस फोटोग्राफी चषक** | **- नागपुर शहर** |
| **३) पोलीस व्हिडीओग्राफी चषक** | **- कोकण परिक्षेत्र** |
| **४) माहिती तंत्रज्ञान प्राविण्य चषक** | **- दहशतवाद विरोधी पथक** |
| **५) श्वान स्पर्धा चषक** | **- नांदेड परिक्षेत्र** |
| **६) घातपात विरोधी तपासणी चषक** | **- एस.आर. पी. एफ. परिक्षेत्र** |
| **७) कै. अशोक कामटे फिरता चषक** | **- एस.आर. पी. एफ. परिक्षेत्र** |
| **८) उत्कृष्ट डॉग चषक** | **- डॉग - आझाद, कोल्हापुर परिक्षेत्र** |

| | |
|---|---|
| **सर्वोत्कृष्ट तथा सर्वसाधारण विजेता संघ** | **- दहशतवाद विरोधी पथक** |
| **सर्वसाधारण उप विजेता संघ** | **- नागपुर शहर** |
| **गुन्हे अन्वेषण विभागाचा शताब्दी फिरता चषक विजेता संघ** | **- दहशतवाद विरोधी पथक** |

प्रमुख पाहुणे आदरणीय श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन केले. पोलीस कर्तव्य मेळावा ही केवळ एक स्पर्धा, तर आपल्या पोलीस दलातील शिस्त, कौशल्य, शारीरिक क्षमता आणि मानसिक तयारी या सगळयाच्या सहकार्याने आणि समन्वयाने आपल्या कामात आपण किती उत्तम कामगिरी करु शकतो, याचे प्रदर्शन घडवणारा एक महत्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले.

आपल्या भाषणात स्पर्धकांनी दाखविलेली मेहनत, चिकाटी, प्रामाणिकपणा व संघभावना खरोखर आर्दशवत असल्याचे सांगुन या स्पर्धातुन केवळ शारिरीक ताकद किंवा शस्त्र कौशल्य नव्हे तर धैर्य, सजगता आणि जनतेच्या सदैव तत्पर सेवेसाठीची पोलीसांची तयारी अधोरेखीत केली असल्याचे सांगितले. आपले हे प्रयत्न महाराष्ट्र पोलीस दलाची परंपरा अधिक भक्कम करतात. " सदरक्षणाय् खलनिग्रहणाय् " हा आपला मुलमंत्र लक्षात ठेवून आपण केलेले प्रयत्न समाजात सुरक्षितता, विश्वास आणि शांती निर्माण करण्यासाठी नेहमीच उपयुक्त ठरणार आहेत.

प्रमुख पाहुण्यांनी सर्व विजेत्यांचे मन:पुर्वक कौतुक आणि अभिनंदन करुन जे स्पर्धक या वेळी विजयी झाले नाहीत, त्यांना प्रत्येक प्रयत्नात आपल्याला एक नवीन शिकवण मिळत असते आणि त्यातून आपल्यामध्ये अधिक प्रगती करण्याची क्षमता विकसीत होत असते असे मोलाचे मार्गदर्शन केले. विशेषत: ए.टी.एस. संघाने अगदी थोड्याच वर्षामध्ये स्पर्धेत भाग घेवुन, त्यांनी ही स्पर्धा जिंकल्याने त्याचे मन:पुर्वक कौतुक आणि अभिनंदन केले.

चालु वर्षी होणारा ७० वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा, रेल्वे सुरक्षा दल (RPF) तर्फे आयोजित करण्यात येणार असून मागील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावात ज्या प्रमाणे महाराष्ट्र पोलीस संघाने चांगली कामगिरी केलेली आहे, त्याच प्रमाणे ७० व्या मेळाव्यात देखील अधिक क्षमतेने कर्तव्य व सराव करून संस्मरणीय व उल्लेखनीय कामगिरी कराल असा विश्वास व्यक्त केला आहे.

या मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ज्यांनी दिवस रात्र परिश्रम घेतले त्या सर्व अधिकारी व अंमलदार यांचे मनापासुन कौतुक करुन सर्वांच्या एकजुटीमुळेच हा मेळावा इतक्या उत्कृष्ट पध्दतीने पार पडला असल्याबाबत भावना व्यक्त केल्या.

समारोप करतांना सर्वांनी व्यवसायिक कर्तव्याबरोबरच जनतेप्रती असलेली जबाबदारी नेहमी लक्षात ठेवली पाहिजे व महाराष्ट्र पोलीस दल हे देशातील सर्वोत्कृष्ट दलांपैकी एक म्हणुन ओळखले जाते आणि ही प्रतिष्ठा पुढेही टिकविण्यासाठी आपल्याला अधिक सजग, सक्षम व सेवाव्रत वृत्तीने कार्यरत राहुन कर्तव्य करणे गरजेचे असल्याबाबत वक्तव्य केले.

सदर कार्यक्रमास,

श्री, सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
श्री सुनील रामानंद, अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य., पुणे
श्री. दत्तात्रय पडसलगीकर, गुणश्री संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी , पुणे
श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पुणे
श्री. राजकुमार व्हटकर, अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई
श्री. नवल बजाज, अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक
श्री. सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे-पुर्व, गु.अ.वि., म. राज्य, पुणे,
श्री. सुधीर हिरेमठ, विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे-पश्चिम, गु.अ.वि., म. राज्य, पुणे,
श्री. दत्तात्रय शिंदे विशेष पोलीस महानिरीक्षक, (रा.गु.अ.कें.) गु.अ.वि., म. राज्य, पुणे
श्री. रंजनकुमार शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र
श्रीमती ज्योतीप्रिया सिंह, विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक, पुणे
श्री. एम. रामकुमार, पोलीस उप महानिरीक्षक तथा संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
श्री. अमोघ गावकर, पोलीस उप महानिरीक्षक, प्रशासन, गुअवि, म.रा. पुणे
व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

त्याच प्रमाणे सदर सांगता समारंभास पोलीस कुटुंबीय तसेच प्रिन्ट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधी हजर होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. दत्तात्रय शिंदे विशेष पोलीस महानिरीक्षक, (रा.गु.अ.कें.) गु.अ.वि., म. राज्य, पुणे यांनी केले तसेच सुत्रसंचलन श्रीमती अर्चना कदम, पोलीस निरीक्षक, गु.अ.वि., पुणे शहर व श्री सचिन देवडे, पोलीस हवालदार, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले.

पोलीस उप अधीक्षक,
का.व सं., गुअवि, म.रा. पुणे